## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक - १४६/२०२१/नंदुरबार**

१ श्री. राकेश पी. सोमवंशी, : अपिलार्थी
रा. ४१, उत्तरायण शिल्प,
श्री. रघुवीर नगर, खोडाई देवी रोड, नंदुरबार,
ता. जि. नंदुरबार-४२५४१२.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
प्रमुख लिपीक,
सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार,
ता. जि. नंदुरबार.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा, : प्रतिवादी
उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार,
ता. जि. नंदुरबार.

**सुनावणी दिनांक - ०२/०८/२०२२**

अपिलार्थी यांनी दिनांक ०९/११/२०२० रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आदेश पारित केला नाही. तसेच माहिती देण्याचे आदेश झालेले नाहीत, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची दिनांक ०२/०८/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती.

**सुनावणीसाठी उपस्थित-** तत्कालीन/विद्यमान जन माहिती अधिकारी, तत्कालीन

**सुनावणीसाठी अनुपस्थित-** अपिलार्थी, विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी

अपिलार्थी यांचा दिनांक १२/०१/२०२१ रोजीचा माहिती अर्ज अधीक्षक, सार्वजनिक बांधकाम मंडळ, धुळे यांचेकडुन दिनांक १९/११/२०२० रोजी हस्तांतरणाने प्राप्त झाला. सदर माहिती अर्जान्वये अपिलार्थी यांनी नंदुरबार येथे सेवा निवृत्त झालेले माजी उप अभियंता राजेंद्र शिवदास निकम यांच्या शासकीय सेवा पुस्तिकेत नोंद असलेला शाखा, कनिष्ठ व उप अभियंता पदाचा उप विभाग निहाय सविस्तर माहिती मागितली होती. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना कोणतेही उत्तर दिलेले नाही.

तद्नंतर कोणतेही उत्तर न मिळाल्याने अपिलार्थी यांनी दिनांक १२/१२/२०२० रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपील अर्ज दिनांक २२/१२/२०२० रोजी सहाय्यक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, धुळे यांचेकडुन हस्तांतरणसाने प्राप्त झाला. सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी दिनांक २७/०१/२०२१ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना श्री. निकम, उप अभियंता,

सेवानिवृत्त यांचा कार्यालयात कार्यरत असल्यापासुनचे उप विभागनिहाय कार्यरत कालावधी सात दिवसाच्या आत सादर करण्यात यावा, असे आदेश देण्यात येऊन प्रथम अपील निकाली काढले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८/०२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये श्री. निकम, उप अभियंता हे दिनांक १७/०६/२०१६ ते दिनांक ३१/१०/२०२० पर्यंत उप अभियंता पदावर विभागांतर्गत कार्यरत होते, असे कळविले आहे.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक १२/०१/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे दिसून येत नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर माहिती पुरविली आहे. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

आज सुनावणीदरम्यान विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हे कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्वपरवानगी न घेता संयुक्तिक कारणाशिवाय अनुपस्थित आहेत. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ मध्ये द्वितीय अपिलाच्या सुनावणीस गैरहजर राहिल्यास आवश्यकतेनुसार त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्याची तरतूद आहे. त्यानुसार शिफारस करणे आवश्यक आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झालेली असल्याने पुनश्च: माहिती पुरविण्याची आवश्यकता नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार, श्री. ए एस. एल. खरे यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० (१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

२) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार यांना सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार असे आदेश देण्यात

येत आहेत की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द उपरोक्त परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येवून त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा.

३) वरील आदेशांसह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक १४६/२०२१/नंदुरबार निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**(समीर सहाय)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नाशिक**

**प्रति,**

१) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबा, ता. जि. नंदुरबार.
यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

२) श्री. सुनिल लक्ष्मण खरे, (तत्कालीन जन माहिती अधिकारी), प्रमुख लिपीक, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार, ता. जि. नंदुरबार.

क्र.रामाआ-नाशिक/द्वि.अ.क्र. १४६/२०२१/नंदुरबार/ओ-१८२६ दिनांक 20/09/2022